**L. A. BILL No. LXXVII OF 2025.**

A BILL

TO AMEND THE MAHARASHTRA CONTROL OF ORGANISED CRIME ACT, 1999.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७.**

**महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ यात सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

१९९९ चा महा. ३०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ यात सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ याच्या कलम २ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (ङ) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :— १९९९ चा महा. ३०.

"(ङ) "संघटित गुन्हेगारी" याचा अर्थ, एखाद्या व्यक्तीने, एकतर संघटित गुन्हेगारी संघटनेचा सदस्य म्हणून किंवा अशा संघटनेच्या वतीने, एकट्याने किंवा संयुक्तपणे,—

(एक) स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी आर्थिक लाभ मिळविण्याच्या, किंवा गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या किंवा उठाव करण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने, हिंसाचाराचा वापर करून किंवा हिंसाचार करण्याची धमकी देऊन किंवा धाकदपटशा किंवा जबरदस्ती करून, अथवा अन्य बेकायदेशीर मार्गांनी; किंवा

(दोन) स्वतःसाठी किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीसाठी आर्थिक लाभ मिळविण्याच्या, किंवा गैरवाजवी आर्थिक किंवा इतर फायदा मिळविण्याच्या उद्देशाने, अंमली औषधिद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ याचे किंवा त्याखाली केलेले नियम यांचे उल्लंघन करून, उक्त अधिनियमान्वये अधिसूचित केल्याप्रमाणे, वाणिज्यिक प्रमाणात अंमली औषधिद्रव्ये किंवा मनःप्रभावी पदार्थ यांची लागवड करून, त्यांचे उत्पादन करून, त्यांची निर्मिती करून, ते जवळ बाळगून, त्यांची विक्री करून, ते खरेदी करून, त्यांची वाहतूक करून किंवा त्यांची साठवणूक करून, १९८५ चा ६१.

चालू ठेवलेले कोणतेही बेकायदेशीर कृत्य, असा आहे;".

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७७.]**

**[ महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९
यात सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**[ विधानसभेने दिनांक ९ जुलै, २०२५ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]**

**[ विधानपरिषदेने दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी
संमत केल्याप्रमाणे.]**

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.